ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २६ | पुणें, बुधवार तारीख ३० नोव्हेंबर, १९६० | अंक ४३

## विविध माहिती

**मदत वाढविण्यास नकार**—१९६०-६१ सालीं नागार्जुन सागर धरणयोजनेसाठी देण्यांत येणाऱ्या मदतींत वाढ करावी अशी विनंती आंध्रराज्य सरकारतर्फे मध्यवर्ती सरकारला करण्यांत आली होती. धरणासाठी द्यावयाच्या मदतींत ३·५ कोटी रुपयांची वाढ करण्यांत यावी असें राज्य सरकारचें म्हणणें होतें. परंतु मध्यवर्ती सरकारनें ही वाढ करतां येणार नाहीं असें कळविलें आहे.

**तिरुनेलवल्ली येथें रेडिओ स्टेशन**— दक्षिण भारतांत तिरुनेलवल्ली ह्या ठिकाणीं लवकरच एक रेडिओ स्टेशन उभारलें जाणार आहे. केंद्रासाठी मध्यवर्ती सरकारनें २ कोटी रुपये मंजूर केले आहेत. यंत्रसामुग्रीची मागणी नोंदविण्यांत आली आहे. त्याचप्रमाणें सुमारें ४० एकर जागा ताब्यांत घेण्याची तयारी करण्यांत येत आहे.

**ब्रिटनमधील हिंदी लोक**— १९६० च्या पहिल्या ९ महिन्यांत भारतामधून ब्रिटनमध्यें चरितार्थासाठी गेलेल्या हिंदी लोकांची संख्या ३,८०० आहे, अशी माहिती कॉमन्स सभेंत सांगण्यांत आली. १९५९ सालीं ह्याच कालांत २,३०० हिंदी नागरिक ब्रिटनला गेले होते. पाकिस्तानी नागरिकांची ह्याच कालांतील संख्या अनुक्रमें १,००० व ८५० अशी आहे.

**कोटा येथील धरण**—चंबळ नदी खोरें-योजनेंतील कोटा येथील धरणाचें उद्घाटन पं. जवाहरलाल नेहरू ह्यांनीं केलें. ह्या धरणापासून राजस्थानांत १६२ मैल लांबीचा व मध्यप्रदेशांत ३९२ मैल लांबीचा कालवा काढण्यांत आला आहे. धरणाच्या पाण्यानें ११ लाख एकर जमीन भिजेल.

**गुजरातमध्यें दंतवैद्यकाचें कॉलेज**—गुजरातमध्यें राज्यांतील पहिलें दंतवैद्यकाचें कॉलेज काढण्याचा निर्णय राज्य सरकारनें घेतला आहे. प्रारंभीं कॉलेजमध्यें ८० विद्यार्थ्यांची सोय करण्यांत येईल; पण नंतर सोय वाढविण्यांत येईल. मुंबईमधील हाफकिन इन्स्टिट्यूटसारखी एक संस्था काढण्याचाहि विचार करण्यांत येत आहे. संस्थेसाठी १५ लाख रुपये खर्च येईल.

**टागोर स्मृतिप्रीत्यर्थ नाट्यगृहें**—भारताचे प्रख्यात कवी रवींद्रनाथ टागोर ह्यांची स्मृति कायम ठेवण्यासाठी भारतीय संघराज्यांतील प्रत्येक राज्याच्या राजधानींत एक भव्य नाट्यगृह बांधण्यांत येणार आहे. १९६१ सालीं टागोरांचा १०० वा जन्मदिन साजरा करण्यांत येणार आहे. ह्या नाट्यगृहांपैकी पहिल्या नाट्यगृहाच्या पायाचा दगड मद्रास येथें बसविण्यांत आला.

**माहितीपटांत फायदा नाहीं**— कलकत्ता येथें भारत सरकारच्या माहितीखात्यानें तयार केलेले माहितीपट एका चित्रपटगृहांत मुद्दाम दाखविण्यांत येत आहेत. ह्या कार्यक्रमाचें उद्घाटन करतांना नभोवाणी खात्याचे मंत्री डॉ. केसकर म्हणाले कीं, भारतामधील चित्रपट निर्माते माहितीपट काढीत नाहींत, कारण ते फायदेशीर होत नाहींत.

**बिहारमधील प्राथमिक शिक्षण**— तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीपर्यंत बिहारमध्यें ६ ते ११ वर्षेपर्यंतच्या वयाच्या मुलांना सक्तीचें व मोफत प्राथमिक शिक्षण देण्याची योजना बिहार सरकारनें आंखली आहे. शिक्षण मूलोद्योगावर आधारलेलें असेल व त्यासाठी ८०,००० प्राथमिक शिक्षक लागतील. तिसऱ्या योजनेअखेर ८० लाख मुलांना असें शिक्षण द्यावें लागेल.

**मँगेनीझच्या खाणी बंद**—विदर्भ व मध्यप्रदेशांतील मँगेनीझच्या खाणींची परिस्थिति बिकट झाली आहे. गेल्या सप्टेंबरपर्यंत विदर्भांतील ६५ मँगेनीझच्या खाणी त्यांच्या मालकांनीं बंद केल्या. सरकारनें हस्तक्षेप केला नसता तर ही संख्या १०० पर्यंत पोंचली असती. परदेशांत मँगेनीझच्या खनिजाच्या किंमती घसरल्या आहेत.

**जागतिक बँकेकडे कर्जाची मागणी**—कलकत्ता बंदराची सुधारणा व विकास घडवून आणण्यासाठी भारत सरकारनें जागतिक बँकेकडे १४ कोटी रुपयांच्या कर्जाची मागणी केली आहे. डॉलर्सच्या चलनांत कर्जाची रक्कम २·८ कोटी डॉलर्स भरते. कर्ज मंजूर करण्यापूर्वी जागतिक बँक-तज्ज्ञांचें एक मंडळ पाहणी करण्यासाठी पाठविण्याचा संभव आहे.

**साखरेची परदेशीं विक्री**—भारत सरकारनें ५०,००० टन साखर परदेशीं निर्यात करण्यास खुली केली होती. त्यांपैकीं १०,००० टन साखर निर्यात करण्यांत आली आहे. त्यांपैकी ७,००० टन मलायांत पाठविण्यांत आली व बाकीची मध्यपूर्वेकडील देशांत पाठविण्यांत आली. ह्या व्यवहारांत ४६ लाख रुपयांचें परदेशीय चलन मिळालें.

**बोनसच्या ऐवजीं बचत सर्टिफिकेटें**—उद्योगधंद्यांतील कामगारांना तीन महिन्यांपेक्षा अधिक बोनस देण्यांत आला तर तीन महिन्यांपेक्षा अधिक असलेल्या महिन्यांचे बोनस रोख न देतां नॅशनल सेव्हिंग सर्टिफिकेटांच्या स्वरूपांत देण्याचा विचार मद्रास सरकार करीत आहे. त्यासाठी पेमेंट ऑफ बोनस ॲक्टमध्यें दुरुस्ती करण्यांत येणार आहे.

**नौदलांतील अधिकाऱ्यांचे कारभार !**— सीलोनच्या नौदलांतील सात अधिकारी व कमांडर ह्यांनीं आपल्या अतिपूर्वेकडील दौऱ्यांत नौदलाच्या बोटींचा उपयोग करून अनेक प्रकारचा माल बेकायदा सीलोनमध्यें आणला, असा आरोप सीलोनच्या सरकारनें केला असून सध्यां त्याची तपासणी चालू आहे. ह्या कामीं दोघा गुप्त पोलिसांना हॉंगकॉंग व सिंगापूरला पाठविण्यांत आलें आहे.

**ब्रह्मदेशाकडून तांदूळ**—भारतानें ब्रह्मदेशाकडून त्याच्या १९६१ च्या तांदुळाच्या पिकांतून २ लाख टन तांदूळ विकत घेण्याचा करार केला आहे. तांदुळाच्या खरेदीबाबत अद्याप लांब मुदतीचा करार झालेला नाहीं. त्यासंबंधीं वाटाघाटी चालू आहेत. उलट, ब्रह्मदेश भारताकडून सध्यां १ कोटी रुपयांचा माल घेणार आहे.

**अमेरिकेचा नवा उपग्रह**—अमेरिकेच्या लष्करी खात्यानें २८० पौंड वजनाचा एक कृत्रिम उपग्रह आकाशांत सोडला आहे. हा उपग्रह पृथ्वीभोंवतीं ४०० मैल अंतरावर फिरेल आणि हवामानाविषयीं माहिती घाडेल. ही माहिती भारतासह १५ देशांना पुरविण्यांत येणार आहे.

**तेलावर चालणारीं रेल्वे एंजिनें**—भारत सरकारनें डिझेल तेलावर चालणारीं रेल्वे एंजिनें तयार करण्याचा एक कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. कारखान्याची तपशीलवार आखणी अद्याप व्हावयाची आहे. रुंद रुळावरील व अरुंद रुळावरील अशीं दोन्हीं प्रकारचीं एंजिनें तयार करण्यांत येणार आहेत. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत भारताला दरसाल १०० एंजिनें लागतील.

**ब्रिटनमधील फोर्डचा कारखाना**—अमेरिकेंतील डेट्रॉइटमधील फोर्ड कंपनीला तिच्या ब्रिटनमधील उपकंपनीचा संपूर्ण ताबा घेण्याची परवानगी ब्रिटिश सरकारनें दिली आहे, अशी माहिती कॉमन्स सभेंत सांगण्यांत आली. परदेशीय चलनावरील नियंत्रणामुळें अशी परवानगी द्यावी लागते.

**रेडिओनियंत्रित ट्रॅक्टर्स**—स्टालिनग्राडमधील एका कारखान्यानें रेडिओनें नियंत्रित करतां येणारे ट्रॅक्टर्स बनविण्यास प्रारंभ केला आहे. ह्या शोधामुळें एकाच माणसाला दोन किंवा तीन ट्रॅक्टर्स चालवितां येतात. त्यामुळें शेतावर काम करण्यास कमी माणसें लागतील.


दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

THE DECCAN INSTITUTE OF COMMERCE.

*717, Budhwar Peth, Poona 2.* *Phone No. 2360*

**BANKERS PRACTICAL TRAINING COURSE.**

Admission to Bank-employees and Persons desirous of taking up Banking Career.

Duration—3 months. Time—7 to 8 p.m. Fees — Rs. 45 only. Limited admission.

Date of Commencement :— 1st December 1960.

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

समासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

कण आणि क्षण

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

लेखकः-श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"

मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.



आज बाजारांत अनेक ब्राम्ही तेलें उपलब्ध आहेत; परंतु ब्राम्ही तेलाच्या मूळ कल्पनेचें श्रेय सांडू बंधूनांच द्यावें लागेल. सांडू बंधूंच्या आयुर्वेदावरील प्राचीन ग्रंथांच्या गाढ्या व्यासंगाचें तें फळ आहे. ह्या ग्रंथांतून 'ब्राम्ही' या अल्पमोली परंतु बहुगुणी वनस्पतीचा, मेंदूच्या अगर उष्णतेच्या विकारांवर उपयोग सांगितला आहे. त्यांवरूनच श्री. दत्तात्रेय कृष्ण सांडू यांना ब्राम्ही वनस्पतीयुक्त तेल करण्याची कल्पना सुचली. औषधी म्हणून अथवा एरव्हीं सुगंधी तेल म्हणून लावण्यास उपयोगी पडणारें बहुगुणी तेल तयार करण्यासाठीं त्यांनीं प्रयोग सुरूं केले व भारतांत प्रथमच "ओरिजिनल ब्राम्ही तेल" तयार करून तें लोकप्रिय केलें.

आर्य-वैद्यकाच्या इतिहासांतील महत्त्वाचें पान

१८९९-१९६०

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रा. लि. चेंबूर-मुंबई ७१

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रायव्हेट लि. हीरक महोत्सव

# अर्थ

बुधवार, ता. ३० नोव्हेंबर, १९६०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## चंबळ नदीखोरें योजनेचा पहिला टप्पा

चंबळ नदीखोरें योजनेच्या पहिल्या टप्प्याचें काम पूर्ण झालें आहे. ह्या टप्प्यांत गांधीसागर धरण, त्यावर बांधण्यांत आलेलें विद्युत्‌निर्मिति केंद्र, आणि कोटा येथील बंधारा ह्यांचा समावेश होतो. हीं तिन्हीं कामें पूर्ण झालीं असून त्यांचें उद्‌घाटन पंतप्रधान नेहरू ह्यांनीं नुकतेंच केलें. गांधीसागर धरणापासून कालवेहि काढण्यांत आले आहेत. त्याचप्रमाणें विजेच्या वितरणाची व्यवस्थाहि करण्यांत आली आहे. सर्व कामें पूर्ण होण्यास ६ वर्षांचा काल लागला. आतां मध्यप्रदेश व राजस्थान ह्या राज्यांना योजनेचा फायदा मिळूं लागेल. गांधीसागर धरणांतील पाण्यामुळें सुमारें ११ लाख एकर जमिनीला निश्चितपणें पाणीपुरवठा होऊं लागेल. धरणावरील विद्युत्‌निर्मितीच्या केंद्रांत ७५,००० किलोवॅट वीज निर्माण करण्यांत येईल. चंबळ योजनेच्या दुसऱ्या भागाच्या कामासहि सुरुवात करण्यांत आली आहे. ह्या दुसऱ्या टप्प्यांत राणा प्रतापसागर धरण, भोपाळ येथील विद्युत्‌निर्मिति केंद्र आणि आणखी ९०,००० किलोवॅट विजेच्या वाहनाची व्यवस्था करण्यांत येईल. दुसरा टप्पा पूर्ण झाल्यावर आणखी ३ लाख एकर जमिनीला बारमाही पाण्याचा पुरवठा होऊं लागेल. योजनेच्या तिसऱ्या अवस्थेंत कोटा येथील धरण व विद्युत्‌निर्मिति केंद्र ह्यांचा समावेश आहे. ह्या विद्युत्‌केंद्रांत आणखी ४५ ००० किलोवॅट वीज निर्माण होईल. सर्व योजनेला मिळून ९० कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला आहे. तथापि, पहिला टप्पा हा योजनेचा गाभाच आहे. त्यावर सुमारें ६३ कोटी रुपये खर्च होईल.

चंबळ नदीखोरें योजनेची कल्पना आणि तिची प्रत्यक्ष अंमलबजावणी ह्यांना तांत्रिक महत्त्वाबरोबरच इतरहि महत्त्व आहे. एखादी नदीखोरें योजना भौगोलिक व तांत्रिक दृष्टीनें कितीहि उपयुक्त असली तरी अंमलांत आणतांना राजकीय अडचणी उत्पन्न होण्याचा संभव असतो. पण चंबळ नदीखोरें योजना आखतांना व अंमलांत आणतांना मध्यप्रदेश व राजस्थान ह्यांच्या सरकारांनीं प्रशंसनीय सहकार्य केलें. विकास योजना आखतांना राज्याराज्यांतील हद्दींचा प्रश्न विचारांत न घेतां त्या योजनेच्या भौगोलिक व तांत्रिक बाबींचाच विचार झाला तर अशा योजनेपासून अधिकांत अधिक फायदा होण्याची शक्यता खूपच वाढते. राजस्थान व मध्यप्रदेश सरकारांनीं जरूर तें सहकार्य केल्यामुळें चंबळ नदीच्या पाण्याचा जास्तींत जास्त उपयोग करून घेणें शक्य झालें आहे. चंबळ नदी ही विंध्य पर्वतांत उगम पावते व इंदूरपासून उत्तरेला वाहत जाऊन राजस्थानांत शिरते. डोंगरांच्या ज्या खिंडारांतून ती राजस्थानांत शिरते ती खिंड कांहीं ठिकाणीं ८० फूटच रुंद आहे. ह्या भौगोलिक परिस्थितीमुळेंच गांधीसागर येथें तिला अडविणें सोपें झालें आहे. गांधीसागर धरणांत अडविल्या जाणाऱ्या पाण्याची तुलना भाक्रा येथील धरणाच्या पाण्याशीं करतां येईल. अलीकडे भारतामधील कांहीं घटकराज्यांत नद्यांच्या पाण्याच्या वाटपाविषयीं वाद उत्पन्न झाले आहेत. तें लक्षांत घेतां राजस्थान व मध्यप्रदेश सरकारांचें सहकार्य विशेष उल्लेखनीय वाटतें.

## ठेवींवरील व्याजाबाबत बँकांचा नवा करार

ठेवींवरील कमाल व्याजाच्या दराबाबत बँकांतील नवा करार १४ नोव्हेंबरपासून अंमलांत आला. ठेवींच्या मुदतीप्रमाणें त्यांची सात प्रकारांत विभागणी करण्यांत आली आहे व त्या प्रत्येक प्रकारासाठी कमाल व्याजाचा दर निश्चित करण्यांत आला आहे. पूर्वींच्या करारांत तीनच प्रकारच्या ठेवी व व्याजाचे कमाल दर होते. दोन महिन्यांपेक्षा जास्त मुदतीच्या ठेवींवर बँकांना आतां पाव टक्क्यानें जास्त व्याज देतां येतें. मुदती ठेवींची किमान मुदत ७ दिवसांची ३ दिवस करण्यांत आली आहे आणि नोटिशीची किमान मुदतहि ७ दिवसांची ३ दिवसांवर आणण्यांत आली आहे. व्याजाचे नवे कमाल दर खालीलप्रमाणें आहेत :—

| (अ) नोटीशीच्या ठेवी | व्याजाचा दर % |
|---|---|
| (१) ३ ते २१ दिवसांची नोटीस | २ |
| (२) २१ दिवसांपेक्षा जास्त दिवसांची नोटीस | ३ |
| (ब) मुदतीच्या ठेवी | |
| (१) ३ ते २१ दिवस | २ |
| (२) २२ ते ३० दिवस | ३ |
| (३) ३१ ते ६० दिवस | ३¼ |
| (४) ६१ दिवस ते १२ महिने | ३½ |
| (५) १२ महिने ते २४ महिने | ३¾ |
| (६) २४ महिने ४८ महिने | ४ |
| (७) ४८ महिने ते ६० महिने | ४½ |
| (८) ६० महिन्यांपेक्षा जास्त मुदत | ४½ |

२५ कोटी रु. पेक्षा कमी ठेवी असणाऱ्या बँकांना वरील दरापेक्षा ¼ टक्का जास्त व्याज देण्याची परवानगी आहे. ३ दिवसांपेक्षा जास्त पण २१ दिवसांपर्यंतच्या नोटिशीच्या व मुदतीच्या ठेवी मात्र त्या परवानगीला अपवाद आहेत.

पूर्वींच्या करारांत मुदतीच्या ठेवींची कमाल मुदत दोन वर्षें होती; आतां कोणत्याहि दीर्घ मुदतीच्या ठेवी घेण्यास बँकांना मुभा आहे. पूर्वीं दोन वर्षांपेक्षा जास्त मुदतीच्या ठेवी सेव्हिंग्ज सर्टिफिकिटांच्या स्वरूपांतच घेतां येत असत.

---

## रिझर्व्ह बँकेकडून सहकारी बँकांची दोन वेळां तपासणी

सहकारी बँकांवर नियंत्रण व देखरेख ठेवण्याची कोठल्याहि प्रकारची कायदेशीर जबाबदारी रिझर्व्ह बँकेवर नाहीं. तथापि १९५२ पासून रिझर्व्ह बँक संबंधित बँकांच्या अनुमतीनें अशा बँकांची तपासणी करीत असते. अशा रीतीनें या बँकेनें आतांपर्यंत सर्व मध्यवर्ती सहकारी बँकांची दोन वेळां तपासणी केली आहे. रिझर्व्ह बँकेच्या अशा तपासणीमुळें आणि राज्य सरकारांकडून या बँकांचे ठराविक कालानें ऑडिट होत असल्यानें त्यांच्या कामकाजावर नजर ठेवण्यास मदत होते.

## भारतामधील पहिलें शेतकी विद्यापीठ

उत्तर प्रदेश राज्यांत भारतामधीलच नव्हे तर आशिआमधील पहिल्या शेतकी–विद्यापीठाची स्थापना करण्यांत आली आहे. ह्या विद्यापीठाचें उद्घाटन पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू ह्यांनीं नुकतेंच केलें. रुद्रपूर येथें स्थापन करण्यांत आलेल्या ह्या नवीन प्रकारच्या विद्यापीठाला विशेष महत्त्व आहे. विद्यापीठांत दिलें जाणारें शिक्षण जगांतील व्यवहारापासून बरेंच दूर असतें अशी टीका अजूनहि केली जाते. रुद्रपूर येथील विद्यापीठांत दिलें जाणारें शिक्षण संपूर्णपणें व्यावहारिक असेल, असें समजतें. गेल्या कांहीं वर्षांत भारताची औद्योगिक प्रगति बरीच झपाट्यानें झाली आहे आणि त्याचबरोबर तांत्रिक व औद्योगिक शिक्षण देणाऱ्या संस्थाहि वाढल्या आहेत. परंतु शेती हाच भारताचा अजूनहि सर्वांत मोठा व महत्त्वाचा व्यवसाय आहे. देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ८० टक्के लोक अजूनहि आपल्या योगक्षेमासाठी शेतीवर अवलंबून आहेत. भारतामधील प्रत्येक विद्यापीठांत एक अगर अधिक शेतकी कॉलेज असतेंच. परंतु फक्त शेतीसाठी स्थापन करण्यांत आलेलें असें विद्यापीठ नव्हतें. रुद्रपूर येथील विद्यापीठानें ही उणीव भरून काढली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. हें विद्यापीठ अमेरिकेंतील लँड ग्रँट्स कॉलेजच्या धर्तीवर चालविण्यांत येणार आहे. विद्यापीठांत, शेतीशिवाय पशुवैद्यक, गृहशास्त्र, ग्रामीण बाजारपेठा, इत्यादि विषयांचें शिक्षण देण्यांत येणार आहे. विद्यापीठाचें उद्घाटन करतांना पंतप्रधानांनीं शारीरिक श्रमाच्या श्रेष्ठतेवर भर दिला. ह्या विद्यापीठांत शिकविल्या जाणाऱ्या विषयांचा विचार करता, तेथें शिकणाऱ्या विद्यार्थ्यांत अशा श्रमाची आवड निर्माण होईल ह्यात शंका नाहीं.

---

## परदेशी चलनाची चणचण अजूनहि चालूच

भारताचे अर्थमंत्री श्री. मोरारजी देसाई गेल्या सप्टेंबर महिन्यांत ब्रिटन व अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले होते. लोकसभेच्या चालू अधिवेशनांत त्यांनीं आपल्या दौऱ्याविषयीं माहिती सांगितली. ते म्हणाले कीं, भारतापुढें असलेल्या आर्थिक प्रश्नांविषयीं ब्रिटनमध्यें चांगली कल्पना आहे. ब्रिटनकडून भारताला आणखी माल आयात करतां यावा म्हणून ब्रिटननें ५० लाख पौंडांचें नवें कर्ज देऊं केलें आहे. हें नवें कर्ज लक्षांत घेऊन चालू वर्षी ब्रिटनकडून भारताला १·५ कोटी पौंड कर्ज मिळालें असें होईल. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाला मदत म्हणून ब्रिटन भारताला ३ कोटी पौंडांचें कर्ज देण्यास तयार आहे. ह्या कर्जाचा उपयोग करून भारतानें ब्रिटनकडून भांडवली स्वरूपाचा माल विकत घ्यावयाचा आहे. त्याशिवाय दुर्गापूर येथील पोलादाच्या कारखान्याचा विस्तार करण्यासाठी ब्रिटनमधील खाजगी भांडवलदार व सरकार ह्यांच्याकडून २ कोटी पौंड मिळविण्याची खटपट सुरू आहे. परदेशीय देण्याघेण्याची भारताची परिस्थिति बिघडलेली आहे. चालू आर्थिक वर्षाच्या प्रारंभीं भारताची पौंडी गंगाजळी १८९ कोटी रुपयांची होती. आतां ती अवघी ४८ कोटी रुपयांची आहे. चालू आर्थिक वर्ष संपण्याची वेळ आणि दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाची अखेर ही एकदमच येतात. ह्यावेळीं भारताच्या परदेशीय चलनांतील देण्याघेण्याची परिस्थिति प्रतिकूल तफावतीची असेल. कांहीं खास कामासाठी अमेरिकेकडून कर्जे मिळालेलीं आहेत. परंतु त्यामुळें परिस्थितींत फारसा अनुकूल फरक पडणार नाहीं.

## कोळशाचा तुटवडा आणि वाघिणी

बंगाल आणि बिहार राज्यांतील कोळसा खाण-विभागांत दररोज सरासरीं ४८०० वाघिणींत कोळसा भरण्यांत येतो. नोव्हेंबर ते जून या काळांत सर्वसाधारण मालाच्या वाहतुकीसाठी जादा वाघिणींची मागणी येत असल्यानें कोळशाच्या वाहतुकीला देण्यांत येणाऱ्या वाघिणींच्या संख्येवर सहाजिकच मर्यादा पडते. त्यानंतरच्या म्हणजे जुलै ते ऑक्टोबर या काळांत वाहतुकीवरील ताण एकंदरींत कमी असतो व वाहतूक सुरळीत व सहजपणें होते. वाहतुकीच्या गर्दीच्या काळांत कांहीं वेळीं वाघिणींचा तुटवडा पडतो त्यावेळीं अत्यावश्यक ग्राहकी मालाच्या पुरवठ्यासाठी वाघिणी पुरविण्याची व्यवस्था करण्यांत येते. या वर्षाच्या एकंदरींत वाहतुकीचा विचार केल्यास ती समाधानकारक होती असें म्हणतां येणार नाहीं. कोळशाची जलद वाहतूक होण्यासाठी रविवारींहि वाघिणींत कोळसा भरण्यांत येतो. यामुळें अत्यावश्यक गरजांसाठी लागणाऱ्या कोळशाच्या गरजा पुरेशा प्रमाणांत भागविल्या जात आहेत; परंतु त्यामानानें कमी महत्त्वाच्या गरजा मात्र अजून पूर्णपणें भागविण्याचे बाबतींत येणाऱ्या अडचणी पूर्णपणें सुटलेल्या नाहींत.

---

## पासपोर्टसाठी गॅरंटीची स्वावलंबनाची सोय

पासपोर्ट मिळविण्यापूर्वी, परदेशीं जाऊं इच्छिणारांकडून सरकार आर्थिक परिस्थितीची गॅरंटी घेते; ही गॅरंटी देणें कित्येकांना अवघड जाते. श्री. सी. एन. इनामदार ह्यांच्या परदेशगमनाच्या मार्गांत ही अडचण आली आणि ते परदेशीं जाऊं न शकल्यामुळें न्यू इंडिया विमा कंपनींत डेव्हलपमेंट इन्स्पेक्टर म्हणून लागले. अशी अडचण इतरांच्या मार्गांत येऊं नये, ह्यासाठी त्यांनीं "पासपोर्ट गॅरंटी इन्शुअन्स योजना" तयार केली, तिला कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. बी. के. शहा ह्यांनीं मान्यता दिली असून पासपोर्ट अधिकाऱ्यांनींहि ह्या योजनेखालील विमेदारांना पासपोर्ट देण्यास संमति दिली आहे.

---

## भांडवलांत वाढ करण्यासाठी १७४ कंपन्यांना परवानगी

१ एप्रिल, १९५९ ते ३१ ऑक्टोबर, १९६० या काळांत १७४ कंपन्यांना त्यांच्या भांडवलांत वाढ करण्यासाठी परवानगी देण्यांत आली. याच काळांत २१ कंपन्यांना शेअरच्या दर्शनी किंमतीपेक्षा अधिक किंमती शेअर देण्यास परवानगी देण्यांत आली. कांहीं कंपन्यांना दर्शनी किंमतीपेक्षा अधिक किंमतीचे नवे शेअर देण्याची अट घातली. या प्रकरणांतील संबंधित कंपनीच्या लायकीचा विचार करून ही गोष्ट ठरविण्यांत आली.

---

## हातसड तांदूळ कां खावा ?

१ यांत व्हिटॅमिन बी व इतर पोषक सत्त्वें असतात.

२ हातसडीच्या धंद्यामुळें ४६,७५,००० लोकांना रोज काम मिळतें.

३ गिरणीमध्यें सडलेल्या पांढऱ्या तांदुळापेक्षा हातसड तांदुळाचें स्थान फार उच्च आहे.

---

## परराष्ट्रीय कर्जाची रक्कम

भारतास जागतिक बँक व परराष्ट्रांचें मिळून एकूण ६७०·८० कोटी रुपयांचें देणें आहे. या रकमेंत आंतरराष्ट्रीय नाणें निधीस परत करावयाचे कर्जाचा समावेश नाहीं. ही रक्कम १ ऑक्टोबर १९६० रोजीं शिल्लक असलेल्या कर्जाची आहे.

## औद्योगिक उत्पादनाची गति मंदावली

औद्योगिक उत्पादनाची गति थोडी मंदावली असल्याचें दिसून येतें. उत्पादनाचा इंडेक्स ( १९५१=१०० ) मार्च, १९६० मध्यें १७० होता, तो एप्रिल, १९६० मध्यें १६८·४ आणि मे, १९६० मध्यें १६०·२ असा झाला. मार्च ते जून, १९६० या अवधींत सिमेंटच्या उत्पादनाचा इंडेक्स २६०·८, २५७·९, २४९·९ आणि २३७·४ असा उतरत गेला. इतर प्रमुख उत्पादनाचे इंडेक्स नंतर खालीं दिले आहेत. कच्च्या मालाच्या पुरवठ्यांतील अडचणी आणि कोळशाच्या पुरवठ्यांत वक्तशीरपणाचा अभाव, ह्यामुळें मुख्यत: उत्पादनांत घट झालेली आहे. कांहीं मालाच्या उत्पादनांत वाढ झालेली आहे. उदाहरणार्थ :—

### वाढ झालेलें उत्पादन

| उत्पादन | मार्च १९६० | मे १९६० |
|---|---|---|
| मीठ | १२२·७ | ३१७·३ |
| कपडे | १५९·५ | १९०·८ |
| | | ( जूत, १९६० ) |
| कांच व कांच सामान | २२०·७ | २२८·१ |
| हरिकेन कंदील | १२४·० | १३५·१ |
| डीझेल इंजिनें | ५३४·९ | ५९३·२ |
| | | ( जून, १९६० ) |
| शिवण्याचीं यंत्रें | ६८४·२ | ७०४·४ |

### घट झालेलें उत्पादन

| | | |
|---|---|---|
| कोळसा | १५२·६ | १५२·२ |
| साखर | ४७७·८ | ८२·३ |
| | | ( मोसमी ) |
| ताग | १३०·७ | १२८·९ |
| | | ( जून १९६० ) |
| मशीन टूल्स | १,६८९·७ | ६३६·९ |
| विजेचे पंखे | ५१९·२ | ५०६·२ |
| सायकली | १,०७६·१ | ८०४·९ |
| मोटारी | २४८·२ | २०५·२ |
| रबरी पादत्राणें | १९३·८ | १८६·५ |
| रसायनें व रासायनिक माल | २७०·४ | २४०·० |
| साबण | १६५·४ | १४६·६ |
| लोखंड-पोलाद | २०२·५ | १८६·९ |
| इतर धातु | २६३·६ | २४८·५ |
| ॲल्युमिनम | ४८३·४ | ३८५·२ |
| वनस्पति तेल | २२७·१ | १९४·२ |

---

### महाराष्ट्र राज्यांत ९६ कंपन्यांची नोंद

तीस सप्टेंबर १९६० ला संपलेल्या तिमाहींत महाराष्ट्र राज्यांत ११ पब्लिक व ८५ खाजगी कंपन्या मिळून एकूण ९६ कंपन्यांची नोंद करण्यांत आली असून त्यांचें अधिकृत भांडवल अनुक्रमें १३·८० लाख रुपये व ६८४·०५ लाख रुपये असें आहे. यांपैकीं ५३ कंपन्या धातु आणि रसायनें तयार करणाऱ्या, तर १७ कंपन्या व्यापार, उद्योग आणि अर्थविषयक आहेत. सदर तिमाहींत १८ खाजगी व ७ पब्लिक कंपन्या ( वसूल भांडवल ३५·३६ लाख रुपये ) बुडाल्याचें कळलें.

## सरकारी खरेदींमधील विदेशी मालाची खरेदी

सरकारी स्टोअर्सच्या खरेदींत अजूनहि विदेशी मालाची खरेदी मोठ्या प्रमाणावर होत आहे. १९५८–५९ चे त्यासंबंधीं आंकडे हें स्पष्ट करतील:—

( आंकडे कोटी रुपयांचे )

| | देशी | विदेशी | एकूण |
|---|---|---|---|
| अन्नपदार्थ | ५·३६ | ९६·१७ | १०१·५२ |
| तंबाखू | ०·२१ | ... | ०·२१ |
| कापड | १७·३२ | ०·१० | १७·४३ |
| पायतणें | २·२३ | ... | २·२३ |
| इतर कांतडी माल | ०·३२ | ०·०१ | ०·३३ |
| लाकूड | ३·७९ | २·१३ | ५·९२ |
| कागद व कागदी माल | ९·५४ | ०·४८ | १०·०२ |
| रबरी माल | ४·९६ | ०·१२ | ५·०८ |
| रसायनें | ६·५२ | ८·५७ | १५·९ |
| बिगर धातू खनिज माल | ४६·८३ | १५·८९ | ५९·७१ |
| मूलभूत धातूचे धंदे | ५·४९ | ११·३६ | १६·८५ |
| धातूंचा माल | १४·०८ | ०·४५ | १४·५३ |
| वीज यंत्रें | २०·२२ | ६·९६ | २७·१८ |
| इतर यंत्रें | ६·०० | १०·८३ | १६·८३ |
| वहातुकीचीं साधनें | ४३·६६ | ३०·५७ | ७४·२३ |
| इतर | २·७६ | २·०४ | ४·८० |
| एकूण | १८६·२८ | १८५·७७ | ३७२·०५ |

---

### परदेशांतील बँकांत पैसा ठेवण्यासाठी गैरपद्धतीचा अवलंब करणारांस शिक्षा

परदेशांतील बँकांत जादा पैसा ठेवतां यावा म्हणून परदेशांतील पुरवठेदारांशीं संगनमत करून आयातीसाठी देण्यांत आलेल्या इन्व्हॉयसेसच्या बाबतींत लबाडीच्या पद्धतींचा अवलंब करण्यांत येतो. यामुळें या पद्धतीचा अवलंब करून परदेशांतील बँकांत आयात मालाच्या किंमतीपेक्षा जास्त परकीय चलन ठेवण्यांत येतें. अशीं २१ प्रकरणें सरकारच्या निदर्शनास आलीं. तथापि केवळ ६ प्रकरणींच संबंधित व्यक्तींविरुद्ध पुरावा गोळा करतां आला. या ६ प्रकरणांपैकीं ३ प्रकरणांची चौकशी चालू आहे. बाकीच्या तीन प्रकरणांपैकीं एक प्रकरण कस्टम हाउसनें अंमलबजावणी खात्याकडे सुपूर्द केलें असून, तें या बाबतींत आवश्यक ते इलाज योजीत आहेत. दुसऱ्या प्रकरणीं मालाच्या सहा कन्साइनमेंटपैकीं पांच जप्त करण्यांत आल्या व संबंधित व्यक्तीस १,३९००० रु. व ६९,५०० रु. दंड झाला. हें प्रकरणहि अंमलबजावणी खात्याकडे पाठविण्यांत आलें. सहाव्या कन्साइनमेंटतहि हें खातें उपाय योजीत आहे. तिसऱ्या प्रकरणीं संबंधित पार्टीवर माल जप्त करण्याऐवजी ६,००० रु. व गुन्ह्याबद्दल १६,००० रु. दंड बसविण्यांत आला.

---

### तेरा राष्ट्रांशीं रुपयांत देवघेव करण्याचे करार

भारतानें अफगाणिस्तान, बल्गेरिया, ब्रह्मदेश, चेकोस्लोव्हाकिया, इजिप्त, हंगेरी, पाकिस्तान, रशिया, इत्यादि तेरा देशांशीं रुपयांत देवघेव करण्यासंबंधींचे करार केले असल्याचें आज लोकसभेंत प्रश्नोत्तरांचे वेळीं मध्यवर्ती व्यापार आणि उद्योगखात्याचे मंत्री श्री. सतीश चंद्र यांनीं सांगितलें. ते पुढें म्हणाले कीं, याशिवाय स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशननें उत्तर कोरिया व ट्युनिशिया या देशांतील सरकारी व्यापारसंघटनांशीं असे करार केले आहेत.

## हात-सड तांदूळ

भारतांतील ७० टक्के लोकांचें भात हें अन्न आहे. त्यांपैकीं ५० टक्के लोक असे आहेत कीं फक्त भात हेंच त्यांचें मुख्य अन्न आहे. दरडोई साधारणपणें १३७ पौंड तांदूळ दरवर्षी लागतो. प्रत्येक भागांत हें प्रमाण कमी-अधिक आहे. पंजाबमध्यें दरमाणशीं १४ पौंड तांदूळ लागतो, तर आसाममध्यें दर माणशीं ४३५ पौंड तांदूळ प्रतिवर्षी लागतो. देशांतील निरनिराळ्या भागांतील भोजनपदार्थांत सर्वांत जास्त उपयोग तांदुळाचाच करतात. त्यामुळें देशाच्या अर्थव्यवस्थेंत तांदुळाचें स्वतंत्र महत्त्व आहे. परंतु आपल्यापैकीं फारच थोड्या लोकांना या धान्यांतील घटकांची माहिती आहे. तांदुळांत शरीरवाढीस पोषक असे कोणते घटक आहेत तें पाहूं. साधारणपणें तांदुळांत खालील गोष्टी प्रामुख्यानें दिसून येतात :—

स्टार्च, प्रोटीन, फॅट, कॅलशिअम, फॉस्फरस, लोह.

जीवनसत्त्वें : ए व बी. हे घटक तांदुळांत वरचें तूस काढल्यानंतर दिसून येतात.

गिरणींत संपूर्ण पॉलिश केलेला तांदूळ म्हणजे निव्वळ स्टार्च पिष्टमय पदार्थ होय. कारण त्यांत असलेलीं जीवनसत्त्वें व फॅट हीं गिरणींतील प्रक्रियेंत निघून जातात. जीवनसत्त्वें हीं सर्व गिरणींतील प्रक्रियेंत आपण फेंकून देतों. तीं कोंड्यामध्यें असतात. पाश्चिमात्य देशांत याच कोंड्यापासून ब्रॅन बिस्किट्स केलीं जातात. हीं आजारी माणसास देण्याची शिफारस-डॉक्टर नेहमींच करतात. हातसड तांदुळांत जीवनसत्त्वें नाश पावत नाहींत. त्याला दोन गोष्टी कारणीभूत आहेत. गिरणींत ( हलर ) घर्षणानें निर्माण होणाऱ्या उष्णतेमुळें तांदुळांतील कोंडा निघून जातो. हा भाग म्हणजे तांदुळांतील फॅट होय. पॉलिशमुळें जीवनसत्त्वें निघून जातात. हातसड तांदूळ हा ३ टक्के पॉलिश केला जातो. त्यामुळें या तांदुळांत जीवनसत्त्वें जास्त राहतात.

तांदुळांत पुढील पौष्टिक सत्त्वें आहेत :—

| पौष्टिक पदार्थ | पॉलिश न केलेले तांदूळ | हातसड तांदूळ | गिरणींतील तांदूळ |
|---|---|---|---|
| प्रोटीन ( प्रथिनें )— | टक्के | टक्के | टक्के |
| ग्रॅम्स | ७·७ | ७·२ | ६·९ |
| कॅलशिअम ( मिलिग्रॅम्स ) | १५ | १३ | १० |
| फॉस्फरस ( मिलिग्रॅम्स ) | ३६९ | १४६ | १०७ |
| लोह ( मिलिग्रॅम्स ) | ४·० | २·२ | २·० |
| जीवनसत्त्व-ब ( मॉयक्रोग्रॅम्स ) | ३६० | १९० | १०५ |
| निकोटिन ॲसिड ( मिलिग्रॅम्स ) | ३·५ | २·२ | १·० |

तांदुळाच्या कोंड्याचें पृथक्करण :—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पाणी | ८·९ | ते | १२·५ | टक्के |
| प्रोटीन | १०·६ | ,, | १३·४ | ,, |
| नायट्रोजन | ३८·७ | ,, | ४४·३ | ,, |
| फॅट | १०·१ | ,, | २२·४ | ,, |
| फायबर | ९·१ | ,, | १४·१ | ,, |
| ॲश | ९·३ | ,, | १४·३ | ,, |
| पेन्टोसन | ८·७ | ,, | ११·४ | ,, |
| जीवनसत्त्व ब | ५४४ | ( मिलिग्रॅम्स ) | | |

जीवनसत्त्व 'ब' च्या दृष्टीनें हातसड तांदुळाची गहूं व गिरणींत पॉलिश केलेल्या तांदुळांशीं तुलना करूं.

| | | | |
|---|---|---|---|
| गहूं | जीवनसत्त्वें ब | ५·३ | टक्के |
| हातसड तांदूळ | ,, | २·२ | ,, |
| गिरणींतील तांदूळ | ,, | १·१ | ,, |

वरील गोष्टीवरून स्पष्ट होईल कीं, हातसड तांदुळांत जीवनसत्त्व ब १, गव्हांतील ब १ जीवनसत्त्वाच्या जवळ-जवळ निम्मे असतें. तर गिरणींतील तांदुळांत ½ च असतें.

हातसडीचे तांदूळ तयार करणें हें आमच्या देशांतील भगिनींचें नित्याचें काम आहे. या कामामुळें त्यांना पूर्णवेळ अथवा अर्धवेळची रोजगारी सहज मिळते. हातसड उद्योगामुळें साळींतून निघणाऱ्या तांदुळांचें प्रमाण गिरणीपेक्षा जास्त असतें. त्यामुळें देशाला आजच्या परिस्थितींतहि अधिक प्रमाणांत तांदूळ मिळूं शकेल. हातसड तांदुळाचें भोजनमान उच्च प्रतीचें असल्यामुळें देशांतील लोकांचें आरोग्य चांगलें राहाण्यास मदत होते. गिरणींत भात भरडल्यानें ३ टक्के तूट जादा येते. ही एकूण तूट ३३,६०० टन भरते. ही कांहीं लहान बाब नव्हे.

## खटला दाबून टाकण्यासाठीं लिहून दिलेलें गहाणखत

ईस्टर्न मर्केंटाईल बँक या बँकेच्या २,४०० रुपयांची अफरातफर एका इसमानें केली. त्या इसमावर बँकेनें पीनल कोड, क. ४०८ खालीं खटला भरला. तो गुन्हा ज्या गुन्ह्याबद्दल तडजोड करतां येत नाहीं अशा स्वरूपाचा होता. त्या खटल्याची कारवाई मॅजिस्ट्रेटपुढें चालू होती. तो खटला बँकेनें तडजोड करून काढून घ्यावा या हेतूनें त्या इसमाच्या वडिलानें अफरातफर झालेल्या पैशांबद्दल म्हणजे २,४०० रुपयांबद्दल बँकेला गहाणखत लिहून दिलें. हें गहाणखत लिहून घेतल्यावर बँकेनें पोलिसाला असें कळविलें कीं, खटला पुढें चालविण्यांत येऊं नये. खटल्याच्या समर्थनार्थ बँकेनें कांहींच पुरावा सादर न केल्यामुळें क्रिमिनल प्रोसिजर कोड, क. २५३ (२) खालीं कोर्टानें खटला काढून टाकला. गहाणावरील पैसे वसूल करण्याकरितां बँकेनें गहाण लिहून देणाऱ्यावर दावा आणला. त्या दाव्यांत काढलेल्या मुद्यांपैकी नं. ३ चा मुद्दा असा होता कीं, वरील गहाणखतावर बँकेला दावा आणतां येतो काय ?

या मुद्याचें उत्तर हायकोर्टानें नकारार्थी दिलें. वरील गहाणखत लिहून दिल्याच्या मोबदल्यांत बँकेनें खटला काढून घेण्याचें कबूल केलें होतें. खटला ज्या गुन्ह्याची तडजोड करतां येत नाहीं अशा गुन्ह्याबद्दल होता. गहाणखताचा मोबदला खटला दाबून टाकणें असा असल्यामुळें कराराच्या कायद्याच्या क. २३ खालीं वरील गहाणखत बेकायदा ठरतें. त्या गहाणखतावरील बँकेची मागणी मंजूर करतां येत नाहीं असा निकाल देऊन हायकोर्टानें ती मागणी नामंजूर केली.

"कराराचा मोबदला खटला दाबून टाकणें असा असेल तर तो करार कराराच्या कायद्याच्या क. २३ खालीं बेकायदा ठरतो. बँकेच्या पैशाची अफरातफर एका इसमानें केल्यामुळें त्या इसमावर पीनल कोड, क. ४०८ खालीं खटला चालू असतांना तो खटला बँकेनें काढून घ्यावा या हेतूनें अफरातफर झालेल्या पैशाबद्दल जर बँकेला त्या इसमानें अथवा त्याच्या वडिलानें गहाणखत लिहून दिलें तर तें गहाणखत बेकायदा ठरेल. त्या गहाणखतावर बँकेला दावा आणतां येणार नाहीं कारण गहाणखताचा हेतु खटला दाबून टाकणें असा आहे" असा ह्या निवाड्याचा सारांश आहे. —केरळ हायकोर्टाचा निवाडा. न्यायबोध, नोव्हेंबर १९६०.

## लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनची गुंतवणूक

लाईफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनच्या ३१ डिसेंबर, १९५९ अखेरच्या वार्षिक अहवालांत कॉर्पोरेशनच्या गुंतवणुकीचे तपशीलवार आंकडे देण्यांत आलेले आहेत. त्यावरून असें दिसून येतें कीं, इन्व्हेस्टमेंटची एकूण रक्कम ४५५.९८ कोटी रु. असून त्यापैकी ४४३.७५ कोटी रु. भारतांत आणि १२.२३ कोटी रु. भारताबाहेर गुंतविलेले आहेत.

### रोख्यांची वर्गवारी

| | भारतांतील गुंतवणूक (कोटी रु.) | भारताबाहेरील गुंतवणूक (कोटी रु.) |
|---|---|---|
| मध्यवर्ती सरकारचे व इतर मान्य रोखे | ३७५.७४ | ...... |
| म्युनिसिपल रोखे (वर समाविष्ट नसलेले) | ०.९६ | ...... |
| विदेशी सरकारी, म्युनिसिपल रोखे | ...... | ११.०६ |
| शेअर्स व डिबेंचर्स | ८१.५८ | ०.४७ |
| घरबांधणी योजनांसाठी राज्य-सरकारांस कर्जे | ४.१० | ...... |
| राज्य सरकारांकडून येणें | ६.४५ | ...... |
| सहकारी हौसिंग सोसायट्यांना कर्जें | १.२० | ...... |
| मालमत्तेचे तारणावर कर्जें | १०.३७ | ०.११ |
| मालमत्ता | २२.५७ | ०.५८ |
| इतर गुंतवणूक | ० ७७ | ...... |
| एकूण | ४४३.७५ | १२.२३ |

### सार्वजनिक व खासगी विभाग

कॉर्पोरेशनचे पब्लिक सेक्टरमधील गुंतवणुकीचें प्रमाण वाढत आहे; खासगी सेक्टरमधील प्रमाण कमी होत आहे :—

| | १९५९ | | १९५८ | | १९५७ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | रक्कम (कोटी रु.) | % | रक्कम (कोटी रु.) | % | रक्कम (कोटी रु.) | % |
| **सार्वजनिक विभाग** | | | | | | |
| मध्यवर्ती सरकारचे रोखे | २१२.१८ | | २००.४२ | | १८५.५५ | |
| राज्य सरकारांचे रोखे | ६४.६६ | | ५५.३७ | | ४२.५३ | |
| मान्य रोखे | ३४.५० | | ३१.८३ | | २७.०४ | |
| डिबेंचर्स, प्रेफरन्स व ऑर्डिनरी भाग | ०.२६ | | ०.५० | | | |
| एकूण | ३११.६० | ७८.२ | २८८.१२ | ७८.१ | २२५.१२ | ७७.३७ |
| **खाजगी विभाग** | | | | | | |
| मान्य रोखे | ५.३६ | | ५.१४ | | ५.४८ | |
| डिबेंचर्स, प्रेफरन्स व ऑर्डिनरी भाग | ८१.३२ | | ७५.६७ | | ६९.१४ | |
| एकूण | ८६.६८ | २१.८ | ८०.८१ | | ७४.६२ | २२.५३ |

नेहमींच प्रगतिपर व सुरक्षित

# दि बेळगांव बँक लिमिटेड

बेळगांव

( शेड्यूल्ड बँक )

स्थापना १९३०

★ नियमित बचत केल्यानें कुटुंबाची व राष्ट्राची शक्ति वाढीस लागते.

★ कुटुंबांतील मंगलकार्यें, उच्चशिक्षण किंवा घरबांधणी हीं मोठ्या-खर्चाचीं कामें पार पाडण्यासाठी नियमित बचत करणें अगत्याचें ठरतें.

★ बेळगांव बँकेंत क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटचें वा होम-सेव्हिंग्जचें खातें उघडून आपणांस ही तरतूद योग्य रीतीनें करतां येते.

व्याजाचे आकर्षक दर.

आपल्या सव्वीस शाखांतून सेवावृत्तीनें व्यापार व बचत यांची नेहमींच वाढ करीत असलेली

दि बेळगांव बँक लिमिटेड.

एच्. एस्. कुलकर्णी
जनरल मॅनेजर

# भोर स्टेट बँक लि.

( स्थापना १९४४ )

मुख्य कचेरी :—भोर, जि. पुणें.

शाखा :—पुणें, पाली व शिरवळ

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. १,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | ... | रु. ९१,००० |

*मुख्य कचेरींत भाड्यानें डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.*

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याज वसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात. बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी :— बुधवार घ. नं. ३६१-६२ पासोड्या विठोबानजिक. फोन नं. २५७६.

—अधिक माहितीसाठी लिहा—

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष — न. मू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष

रावसाहेब य. द. खोले

श्री. गो. बा. देवी — श्री. बा. ग. धंद्रुके

## महाराष्ट्र राज्य वेअरहौसिंग कॉर्पोरेशनचें कार्य

### शेतीमाल सुरक्षित ठेवण्याचा अभिनव उपक्रम

तृणधान्यें व कडधान्यें, इतर कोणत्याहि अन्न म्हणून उपयोगांत येणाऱ्या वस्तूंपेक्षा जास्त दिवस सांठवून ठेवतां येतात आणि कदाचित् याच कारणासाठी मनुष्यानें तृणधान्यें व कडधान्यें यांचा महत्त्वाचें व मुख्य अन्न म्हणून स्वीकार केलेला असावा. तृणधान्यें व कडधान्यें यांचा वर्षातून एकदांच हंगाम होतो आणि वर्षाच्या इतर ऋतूंत ती सांठवून ठेवावीं लागतात. धान्येंसुद्धां बेमुदत सांठवून ठेवतां येत नाहींत. हवेंतील आर्द्रता, किडे, उंदीर, इत्यादि-मुळेंसुद्धां नासाडी होते. म्हणून अन्नधान्यांची सांठवण कमींत कमी नुकसान होईल अशारीतीनें करावयास पाहिजे. तृणधान्यें व डाळी यांचेबरोबरच गळिताचीं धान्यें, हळद, मिरची, गूळ, कापूस इत्यादि शेतीमालाचेंहि उत्पादन होतें. या शेतीमालाचें उत्पादन वर्षातून एकदांच होत असल्यानें तो चांगला सांठविण्यासाठी काळजी घेणें जरूर आहे. माल कांहीं दिवसांपुरता सांठवावा लागेल अगर कदाचित तो कांहीं महिनेहि ठेवावा लागेल. ही सांठवण शेतकरी, अडते, किरकोळ व्यापारी, घाऊक व्यापारी करतील अगर सामान्य घरांतून वर्षाचें धान्य असल्यास होईल. माल कोण ठेवतो किंवा किती दिवस ठेवतो या गोष्टी गौण आहेत. मालाचा सांठा होणें हें शेतीचें एक आवश्यक अंग आहे. सध्यांच्या माल-सांठविण्याच्या पद्धति अत्यंत असमाधानकारक आहेत हें सर्वमान्य आहे.

### माल सांठवणीची सदोष पद्धति

माल सांठविण्याच्या सदोष पद्धतीमुळें उंदीर व किडे यांचेमुळें शेतीमालाचें अतोनात नुकसान होतें. अडीचशें ते तीनशें कोटी रु. किंमतीच्या पन्नास ते सत्तर लाख टन अन्नधान्यांचे दरसाल नुकसान होतें हें सर्वश्रुतच आहे. शंभर उंदीर (प्रजोत्पादन न होता) दरसाल २७ मण धान्य फस्त करतात. एक उंदराचें जोडपें दरसाल ८०० उंदरांना जन्म देतें. यावरून फक्त उंदीर अन्नधान्याचा किती मोठ्या प्रमाणावर नाश करतात याची कल्पना येते. उंदरांनीं खाल्ल्यामुळें धान्य कमी होतें एवढेंच नव्हे तर त्यांच्या विष्ठेमुळें धान्य खराब होतें. शिवाय, त्यांनीं पोतीं फाडल्या-मुळें सांडलवंड होते ती वेगळीच. याशिवाय उंदीर अनेक रोगजंतूंचा फैलाव करीत असल्यानें तो मनुष्यजातीचा मोठा शत्रूच होऊन बसला आहे. अगदीं साधारण अंदाजाप्रमाणें आपण जेवढें अन्नधान्य उत्पादन करतों त्याच्या पांच टक्के अन्न उंदीर व किडे यामुळें नाश पावतें. एवढें धान्य आपल्या सबंध देशाला पंधरा दिवस पुरेल. म्हणून शास्त्रीय पद्धतीनें माल ठेवण्याची अत्यंत निकडीची गरज चांगल्या बांधणीच्या आणि तज्ज्ञ माणसांच्या देखरेखीखाली असलेल्या कोठारानें पुरी होईल.

### नियंत्रित वखारींचा फायदा

शेतीमालाची, कोठाराविषयक कायद्याखाली सुरू केलेल्या नियंत्रित कोठारांत माल ठेवण्याची पद्धत आपल्या देशांत नव्यानेच सुरू करण्यांत येत आहे. परंतु अशा वखारींत किंवा कोठारांत माल ठेवणें वा निव्वळ गोदामामध्यें माल ठेवणें यांत फरक आहे. नियंत्रित कोठारांत शास्त्रशुद्ध पद्धतीनें माल ठेवला जातो. त्याशिवाय कोठाराच्या पावतीच्या तारणावर, ठेवणाराचा मालावरील मालकीहक्क राहूनहि कमी व्याजानें व सहजरीत्या कर्ज मिळतें आणि पडत्या भावांतील विक्री टाळतां येऊन, ठेवणाऱ्याच्या कार्यक्षमतेंत भर पडते. या सर्व उपयुक्त सोयींना वखारींत माल ठेवल्यानें लाभ होतो. या व्यतिरिक्त वखारींत माल ठेवल्यानें आणखीहि फायदे होतात. ते म्हणजे शास्त्रशुद्ध पद्धतीनें मालाची प्रतवारी ठरवितां येते, प्रतवारीमध्यें सुधारणा करणें शक्य होते, मालाचा आग व चोरी याबद्दल विमा उतरलेला असल्यानें जादा सुरक्षितता मिळते, मालाची विक्री प्रत्यक्ष माल न हलवितां, वा वखारीची नुसती पावती विकून करतां येते व त्यामुळें मजुरीचा खर्च वाचतो. मालाचा नमुना पाहून विक्री करण्याच्या पद्धतींतील संभाव्य धोके टाळतां येतात. वखारींत माल ठेवण्याचे पद्धतीमुळें मालाची बाजारांत नियमित आवक होते व त्याचबरोबर मालाच्या भावांतील अनिश्चित चढ-उतार कमी होण्यास मदत होते.

### ऐतिहासिक पार्श्वभूमि

देशांतील शेतीमालाच्या विक्रीच्या पद्धतींत प्रगति किंवा वाढ करण्यामध्यें नियंत्रित वखारींचें महत्त्वाचें स्थान आहे. यावर आतांपर्यंत सरकारनें नेमलेल्या बऱ्याच समित्या व कमिशनें यांनीं भर दिला आहे. १९२५ सालीं नेमलेल्या रॉयल कमिशननें या प्रश्नाकडे प्रथम लक्ष वेधलें. १९३२ सालीं सेंट्रल बँकिंग इंक्वायरी कमिटीनें कर्जाची पद्धत भक्कम पायावर उभारली जावी या हेतूनें नियंत्रित वखारीच्या कार्यक्रमाची जोरानें शिफारस केली. अशाच प्रकारच्या शिफारसी इतर कमिट्यांनींहि, विशेषत: १९४४ मध्यें गाडगीळ कमिटी व १९४६ मध्यें सरैया कमिटी यांनीं केल्या. रिझर्व्ह बँकेनेंहि शेतकऱ्यांना कर्ज मिळण्याच्या व्यवस्थेंत वाढ व सुधारणा व्हावी या हेतूनें सर्व राज्यसरकारांना वखारीसंबंधी जरूर ते कायदे पास करण्याच्या विनंतीस विजयाराघवाचारियर कमिटीनें पाठिंबा दिला. १९४९ सालीं रूरल बँकिंग इंकायरी कमिटीनें वेअरहौसिंग डेव्हलपमेंट फंड निर्माण करण्याची शिफारस केली. सर्व देशभर नियंत्रित वखारी उघडण्याची पहिल्या पंच-वार्षिक योजनेंत प्लॅनिंग कमिशननें शिफारस केली.

---

### लाइफ इन्शुरन्स कॉर्पोरेशनचे प्रदेशांतील व्यवहार

लाइफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन आतां केनिया, युगांडा, टांगानिका, झांझीबार, मलाया, सिंगापूर, मॉरिशस, एडन, हाँगकाँग आणि फिजी या देशांत विम्याचें काम करीत असून या देशांतून १५ ऑक्टोबर १९६० पर्यंत एकूण २८·६० कोटी रु. चें काम मिळालें.

---

**सरदार पटेल ह्यांचें चरित्र**—भारताचे पहिले उपपंतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल ह्यांचें चरित्र लिहिण्याचें काम काँग्रेसचे माजी अध्यक्ष श्री. धेबर ह्यांनीं पत्करलें आहे. चरित्र पुरें होण्यास एक वर्षाचा काळ लागेल. बहुधा तें १९६१ च्या ऑक्टोबरच्या ३१ तारखेस प्रसिद्ध होईल. हा दिवस सरदार पटेल ह्यांचा जन्मदिन आहे.

**आंतरवंशीय विवाहांची आवश्यकता**— ब्रिटनमधील विख्यात मानसोपचार शास्त्रज्ञ डॉ. डेव्हिड स्टॅफोर्ड-क्लार्क ह्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं, जगांतील छळ करण्याची वृत्ति व पूर्वग्रह ह्यांना मूठमाती द्यावयाची असेल तर गोऱ्यांनीं कृष्णवर्णीयांशीं विवाह केले पाहिजेत. लंडनमधील एका इस्पितळांत ते मानस-वैद्यकाचे सल्लागार आहेत.

**मुलांसाठी वस्तुसंग्रहालय**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत दिल्ली येथें मुलांच्यासाठी एक म्युझियम स्थापन करण्यांत येणार आहे. त्याच्या स्थापनेसाठी सुमारें १७ लाख रुपये खर्च येईल अशी माहिती मध्यवर्ती सरकारच्या शिक्षणखात्याच्या एका अधिकाऱ्यानें सांगितली आहे. ८

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.